# हॅलो प्रभात

नवे विचार...नवी सुरुवात

RNI NO. MAHMAR/2020/79996

■ संपादक : संजीव शाळगावकर

■ मुंबई ■ पुणे ■ अहिल्यानगर ■ कोल्हापूर ■ सातारा ■ सांगली

पुणे • वर्ष : ०६ • अंक : २८४ • शनिवार, दि. १७ जानेवारी २०२६ • किंमत : ३ रूपये • पाने : ४


## पुण्यात उद्धवसेना-मनसेची युती फसली

**पुणे : हॅलो प्रभात**

महापालिका निवडणुकीत मुंबईप्रमाणे पुण्यातही प्रथमच महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि उद्धवसेनेची युती झाल्याने कार्यकर्त्यांच्या आशा उंचावल्या होत्या. ही दोन्ही पक्षांच्या अस्तित्वाची लढाई होती. २०१७ मध्ये मनसेचे केवळ २ उमेदवार निवडून आले होते, त्यापेक्षा अधिक जागा निवडून आणण्याचा पण मनसेच्या कार्यकर्त्यांनी केला होता. मात्र, मनसेला त्या दोन जागा देखील राखता आल्या नाहीत. मनसे आणि उद्धवसेनेची युती होऊनही मनसेचे 'इंजिन' सुसाट धावण्याऐवजी बंदच पडण्याची नामुष्की मनसेवर ओढवली. मनसेला निवडणुकीत खातेच उघडता आले नाही. मनसेने ४१ जागांवर निवडणूक लढविली होती. त्यातही प्रभाग क्रमांक २५ अ मध्ये मनसेच्या उमेदवार अमृता भोकरे व भाजपच्या उमेदवार स्वप्नाली पंडित यांच्यात चांगली लढत झाली. परंतु, ११ हजार ५०७ मतांनी पंडित यांनी बाजी मारली. त्यामुळे किमान १ जागा मिळण्याचे मनसेचे स्वप्न भंगले.

# महाराष्ट्राच्या राजकारणातील धुरंधर!

## मुंबई महापालिकेत भाजपाच 'दि बॉस'

## 'गेम चेंजर' ठरलेल्या कारणांबाबत मंथन

विकासाचा मुद्दा प्रचाराच्या केंद्रस्थानी..

**मुंबई : हॅलो प्रभात**

मुंबईत पहिल्यांदाच भारतीय जनता पार्टीने सत्ता मिळवली आहे. भाजपा, शिवसेना आणि आरपीआय आठवले गटाने सुमारे १२० पेक्षा जास्त जागांवर आघाडी घेतली आहे. त्यामुळे मुंबईच्या राजकारणामध्ये भाजपा हाच 'दि बॉस' ठरला आहे. भाजपाच्या या 'गेम चेंजर' विजयाची नेमकी कारणे काय याबद्दल राजकीय विश्लेषकांमध्ये मंथन सुरू असून दूरदर्शनवर मोठ्या प्रमाणावर चर्चा सुरू आहेत.

राज्यातील महानगरपालिकेच्या निवडणुकीचे निकाल समोर आले आहेत. मुंबईत पहिल्यांदाच भाजपने सत्ता मिळवली आहे. त्यामुळे आता मुंबईत 'महायुती' चा महापौर बसणार हे जवळपास निश्चित झाले आहे. हा उद्धव आणि राज ठाकरे बंधुंना मोठा धक्का बसला आहे. भाजपच्या या विजयामागे अनेक कारणे आहेत.

भाजपा आणि महायुतीच्या नेत्यांनी प्रचार करताना भाजपा सरकारच्या काळात केलेल्या विकासकामांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवण्याचे काम केले. मुंबईतील रस्ते, फ्लायओव्हर, मुंबईकरांसाठी घरे यासह अनेक अनेक मुद्यांवर 'महायुती' ने मते मागितली. याचीच पोचपावती त्यांना जनतेने दिली आहे. मुंबईकरांनी महायुतीच्या १२० पेक्षा जास्त उमेदवारांना विजयी केले आहे. ठाकरे बंधूंच्या मराठी अस्मितेला हिंदू,मराठी महापौरने उत्तर देण्यात आले. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत ठाकरे बंधुंकडून मराठी अस्मितेचा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. मुंबई भाजपच्या हातात मराठी माणसाची कोंडी होईल, असं ठाकरेंकडून सांगण्यात आलं, मात्र, या भाजपा आणि महायुतीकडून मुंबईचा महापौर हा हिंदू आणि मराठीच होईल अशी ग्वाही मतदारांना दिली. त्यामुळेचे मराठी लोकांनी त्यांच्यावर विश्वास दाखवल्याचे या निकालातून समोर आले आहे. मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी भाजपा आणि एकनाथ शिंदेंनी जबरदस्त तयारी केली होती. दोन्ही नेत्यांनी अनेक सभा घेतल्या. या सभांमधून विरोधकांवर टीका टाळत विकासकामांची माहिती जनतेला दिली. एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळात केलेल्या कामांची माहिती या सभांच्या माध्यमातून जनतेला देण्यात आली. तसेच आगामीपाच वर्षांमध्ये भाजपाचा विकासाचा प्लॅन काय आहे, हेही भाजपकडून पटवून देण्यात आले. त्यामुळे हा मोठा विजय मिळाला.

### शिंदेंची साथ फायद्याची

मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपाने एकनाथ शिंदेंसोबत महायुती करत एकत्र लढण्याचा निर्णय घेतला. यामुळे एकनाथ शिंदेंच्या मागे असलेली ताकदही भाजपला मिळाली. शिवसेनेत फूट पडल्यानंतर अनेक माजी नगरसेवकांनी एकनाथ शिंदेंसोबत जाण्याचा निर्णय घेतला होता. यामुळे तळागाळापासून भाजपला फायदा झाला. याचेच फळ म्हणून 'महायुती' मुंबईत विजयी ठरली आहे.

### सात वर्षांपासूनची मेहनत

मुंबई महापालिकेसाठी भाजपने गेल्या ६-७ वर्षांपासून प्लॅनिंग केले होते. सुरूवातीला आशिष शेलार आणि त्यानंतर आता अमित साटम यांच्या नेतृत्वात भाजपकडून रणनीती आखण्याचे काम केले होते. तळागळात कार्यकर्ते काम करत होते. भाजपाने या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला आणि तो यशस्वी झाल्याचे आता समोर आले आहे.

## संक्षिप्त...

### राज्यात एक नंबर ठरले बाप्पू मानकर

**पुणे : हॅलो प्रभात**

नुकत्याच झालेल्या महानगरपालिका निवडणुकीत पुण्याच्या राजकारणात एका नव्या विक्रमाची नोंद झाली आहे. पुणे महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक २५ मधून भारतीय जनता पार्टीचे उमेदवार राघवेंद्र (बाप्पू) मानकर यांनी राज्यात आतापर्यंत हाती आलेल्या निकालांनुसार सर्वाधिक मताधिक्य घेऊन ऐतिहासिक विजय मिळवला आहे. एकतर्फी लढत प्रभाग २५ मध्ये झालेल्या चुरशीच्या लढतीत बाप्पू मानकर यांनी सुरुवातीपासूनच मोठी आघाडी घेतली होती. त्यांनी आपल्या प्रतिस्पर्ध्याचा धुव्वा उडवत तब्बल २६,४९७ मतांचे अधिक्य मिळवले आहे. त्यांना एकूण 31981 मते मिळाली, तर त्यांच्या निकटतम प्रतिस्पर्धी उमेदवार समीर मनोहर गायकवाड यांना (शिवसेना उबाठा) केवळ 5484 मतांवर समाधान मानावे लागले.

### मुलानंतर वसंत मोरे देखील पराभूत

**पुणे : हॅलो प्रभात**

पुणे महानगरपालिकेतील प्रभाग क्रमांक ४० ही यंदाच्या निवडणुकीतील सर्वाधिक चर्चेतील लढत ठरली. मात्र या हाय-व्होल्टेज राजकीय संघर्षात ठाकरे गटाला मोठा झटका बसला असून भारतीय जनता पक्षाने जोरदार मुसंडी मारली आहे. 'कात्रजचा राजा' म्हणून ओळख असलेल्या वसंत मोरे यांचे पुत्र रुपेश मोरे यांचा पराभव झाला असून भाजपच्या रंजना टिळेकर यांनी विजय मिळवला आहे.तर वसंत मोरे यांचा सुद्धा पराभव झाला आहे. रुपेश मोरे यांना मतदारांनी नाकारल्याने ठाकरे गटाच्या आशांवर पाणी फेरले गेले. विशेष म्हणजे, याच निकालानंतर स्वतः वसंत मोरे यांनाही निवडणुकीत पराभवाचा सामना करावा लागला. त्यामुळे या भागात ठाकरे गटाची पकड कमकुवत झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

## कोल्हापूरची सत्ता महायुतीकडे मात्र काँग्रेस प्रभावी विरोधी पक्ष

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

महानगरपालिकेच्या दहा वर्षांनंतर स्थापन झालेल्या नव्या सभागृहात महायुती सत्ताधारी म्हणून कार्यरत राहणार असून काँग्रेस पक्ष प्रभावी विरोधी पक्षाची भूमिका बजावणार आहे. कोल्हापूरकर मतदारांनी समन्वयाची भूमिका घेत दिलेल्या कौलातून हे स्पष्ट झाले आहे.नव्या सभागृहात भाजपाचे 26, शिवसेनेचे 15 आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे 4 असे एकूण 45 सदस्य महायुतीचे असतील. तर काँग्रेसचे 34 आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) चा 1 असा एकूण 35 सदस्य महाविकास आघाडीचे असणार आहेत.

कोल्हापूरकरांनी दाखवलेला विश्वास आणि दिलेली जबाबदारी काँग्रेसचे नगरसेवक प्रामाणिकपणे पार पाडतील, असे प्रतिपादन काँग्रेस नेते सतेज पाटील यांनी केले. "आपण हा लढा किल्ल्यासारखा लढलो. कोल्हापूरकरांनी दिलेली साथ लाखमोलाची आहे," अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या. दरम्यान, भाजप नेते व खासदार धनंजय महाडिक यांनी सर्व मतदारांचे जाहीर आभार मानले.

## काँग्रेसचे पाच शहरात महापौर तर ३५० नगरसेवक

■ हर्षवर्धन सपकाळ ; १० ठिकाणी सत्तेत सहभागी होऊ

**मुंबई : हॅलो प्रभात**

महानगरपालिका निवडणुकीत काँग्रेस पक्षाला मिळालेले यश समाधानकारक नसले तरी यश अपयशाची पर्वा न करता आम्ही वैचारिक लढाई लढलो. जनतेचा विश्वास व कार्यकर्त्यांचा निर्धाराचा लढा या जोरावर काँग्रेस पक्ष राज्यातील सर्वात मोठा विरोधी पक्षाच्या भूमिकेत दिसत आहे. पाच शहरात काँग्रेसचा महापौर तर ३५० नगरसेवक आणि १० ठिकाणी सत्तेत सहभागी होऊ असे चित्र आहे, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष

हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.

बुलढाणा येथे प्रसार माध्यमांना प्रतिक्रिया देताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, संक्रातीच्या पर्वावर महानगरपालिकेच्या निवडणुका झाल्या. काँग्रेस राज्यात दुस-या क्रमांकाचा पक्ष बनला आहे. जेथे शक्य आहे तेथे स्वबळावर तर काही ठिकाणी आघाडी करून काँग्रेस पक्षाने वैचारिक व संघटनात्मक वाढीसाठी निवडणूक लढली. सत्ताधारी भाजपा महायुतीने पैशाचा प्रचंड वापर केला, बोगस मतदान झाले, कुठलीही तडजोड न करता भाजपाच्या बुलडोझरसमोर काँग्रेस कार्यकर्ता निर्धाराने उभा राहिला. हा कार्यकर्त्यांचा विजय असून लढणाऱ्या कार्यकर्त्यांचा सार्थ अभिमान आहे, विजयी उमेदवार व कार्यकर्त्यांचे अभिनंदन करतो. हा काळ संघर्षाचा, वैचारिक लढाईचा आहे आणि काँग्रेस ही लढाई लढण्यास कटीबद्ध आहे. अपशाने खचून न जाता पुढच्या लढाईसाठी आम्ही सज्ज आहोत, असे हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

मुंबईत भाजपाला मिळालेले यश हे फिक्सिंगचा भाग आहे. प्रभाग रचनेपासून पाडू नावाच्या मशिनपर्यंत व शाईचा घोळ हा सर्व फिक्सिंगचा खेळ होता. निवडणूक आयोगाने सावरासावर करणे बंद करावे तसेच भाजपाच्या इशाऱ्यावर चालणे बंद केले पाहिजे. भाजपाकडे कसलीही नैतिकता, लाज राहिलेली नाही. लोकशाही खरोखरच संकटात आहे हे वेगळे सांगण्याची गरज नाही, हुकमशाही वाढत वाढत जाते पण एका ठिकाणी त्याचा फुगा फटतो, आता हा फुगा फुटण्याचा क्षण जवळ आला आहे. कालच उत्तरायण सुरु झाले आहे पुढचा काळ भाजपा व त्यांच्या मित्रपक्षांसाठी अडचणीचा राहणार आहे असा इशारा सपकाळ यांनी दिला.

# विकास आणि पारदर्शकतेचा विजय

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विजयोत्सव साजरा

**मुंबई : हॅलो प्रभात**

मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात झालेल्या महापालिका निवडणुकांमध्ये भारतीय जनता पार्टी सर्वाधिक जागा जिंकत क्रमांक एकचा पक्ष ठरला आहे. भाजपा-महायुतीच्या विकास, सुशासन आणि पारदर्शक कारभाराला मुंबई आणि इतर महापालिका क्षेत्रातील जनतेने स्पष्ट कौल दिल्याबद्दल मतदारांचे आभार मानतो, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी केले. भाजपा प्रदेश कार्यालयात साज-या झालेल्या विजयोत्सवावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. विकासाचा अजेंडा घेऊन आम्ही जनतेमध्ये गेलो आणि जनतेने भाजपावर विश्वास ठेवत भरभरून प्रतिसाद दिला त्याबद्दल मतदारांचा आभारी आहे. हा विजय भाजपाच्या प्रत्येक कार्यकर्त्याला समर्पित आहे अशा शब्दांत त्यांनी कार्यकर्त्यांच्या अपार मेहनतीचे कौतुक केले. ढोलताशांचा गजर करत, गुलाल उधळत, मिठाई वाटप करत भाजपा नेते, कार्यकर्ते, पदाधिकारी यांनी विजयोत्सव साजरा केला. यावेळी प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, कौशल्य विकास

मंत्री मंगलप्रभात लोढा, सांस्कृतिक मंत्री आशीष शेलार, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, मुंबई भाजपा अध्यक्ष आ. अमित साटम, प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, माजी खा. डॉ. किरीट सोमय्या, ज्येष्ठ नेते भाई गिरकर, आ. श्रीकांत भारतीय, महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष आ. चित्रा वाघ, आ. प्रसाद लाड, पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे जयदीप कवाडे आदी उपस्थित होते.

यावेळी श्री. फडणवीस म्हणाले की, जनतेला विकास हवा आहे, प्रामाणिकता हवी आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर असलेला विश्वास पुन्हा एकदा या निकालाने स्पष्ट केला आहे. स्व. बाळासाहेब ठाकरे यांचा आशीर्वाद आमच्या पाठीशी होता म्हणून विजय शक्य झाला असेही त्यांनी नमूद केले. समाजातील प्रत्येक घटकाचा विकास आणि उन्नती हेच ध्येय ठेवून यापुढेही कार्य केले जाईल असा शब्दही त्यांनी दिला. भाजपाच्या कार्याचा आत्मा, विचारांचा आत्मा हिंदुत्ववाद आहे आणि त्याचा आम्हा सर्वांना अभिमान आहे. आमचे हिंदुत्व हे संकुचित नाही तर जो कोणी भारताच्या संस्कृतीचा मान राखतो तो प्रत्येक जण हिंदू आहे असे आम्ही समजतो असेही श्री. फडणवीस यांनी अधोरेखित केले.

जनतेचे प्रेम भाजपाला लाभले आहे त्यामुळे प्रत्येक कार्यकर्त्याची जबाबदारी अधिक वाढली आहे. पुढील काळात सर्व लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते यांनी जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी निस्वार्थ भावनेने काम करायचे आहे असे आवाहन श्री. फडणवीस यांनी केले. श्री. फडणवीस यांनी यावेळी महायुतीतील सर्व मित्र पक्षांचे आभार मानले.

यावेळी प्रदेशाध्यक्ष श्री. चव्हाण म्हणाले की, वर्षानुवर्षे भाजपा कार्यकर्त्याने यशाच्या दिशेने पार्टीला नेण्याचे स्वप्न पाहिले आणि ते स्वप्न साकार करण्यासाठी झोकून देऊन काम केले. त्याग व समर्पण भावनेतून असंख्य कार्यकर्त्यांनी पार्टीची विचारधारा तळागाळात पोहोचवली. हा विजय सर्व कार्यकर्त्यांना समर्पित करतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, भाजपा कार्याध्यक्ष नितीन नबीन, जे. पी. नड्डा यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भाजपाने विकासाच्या अजेंड्यावर निवडणूक लढली.

## विजयाचा उन्माद नको : मुख्यमंत्री

**मुंबई: हॅलो प्रभात**

महापालिका निवडणूक निकाल जाहीर आले आहेत. त्यानंतर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. तसंच कार्यकर्त्यांना संयम बाळगण्याचं आवाहन केलं आहे. विजयाचा उन्माद नको असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार बाबासाहेब आंबेडकर यांना वंदन करतो. महाराष्ट्रात आपल्या पक्षाने महाविजय मिळवला. उपस्थित सर्व कार्यकर्त्यांचे मी आभार मानतो. महाराष्ट्रातील महापालिका निवडणुकांमध्ये महाविजय मिळवला आहे. आपण सगले रेकॉर्ड आपण मोडले आहेत. २९ पैकी २५ महापालिकांमध्ये आपली सत्ता येते आहे. अजूनही मतमोजणी सुरु आहे.पूर्ण बहुमत आपल्यालाच मिळणार आहे. मुंबईच्या महापालिकेवर महायुतीचाच झेंडा फडकेल यात शंका नाही. मोदींच्या आशीर्वादाने विकासाचा अजेंडा दिला आहे तो घेऊनच आपण जनतेत गेले होतो. त्याला जनतेने आशीर्वाद दिला आहे.जे जनमत आलं आहे, त्यावरुन हे सांगतो आहे की लोकांना विकास हवा आहे. लोकांना प्रामाणिक कारभार हवा आहे. महाराष्ट्राचा विकास पंतप्रधान नरेंद्र मोदींवर विश्वास दिला आहे. तसंच बाळासाहेब ठाकरेंच्या स्मृतींचंही मी वंदन करतो कारण त्यांचेही आशीर्वाद आपल्याला लाभले आहेत.

ज्या मुद्द्यांवर आपण निवडणूक लढलो, त्या विकासाच्या अजेंड्याला लोकांनी प्रतिसाद दिला. आमचा अजेंडा विकासच असणार आहे. लोकांच्या आयुष्यात परिवर्तन आणण्यासाठी आम्ही वाटचाल करणार आहोत. आमच्या विचारांच्या आत्मा हिंदुत्ववाद आहे. हिंदुत्ववादी असल्याचा आम्हाला अभिमान आहे. खऱ्या अर्थाने हिंदुत्व आणि विकास यांना वेगळं करता येणार नाही. आम्ही संकुचित हिंदुत्व मानणारे लोक नाहीत, आम्ही व्यापक हिंदुत्व मानणारे लोक आहोत. त्यामुळेच व्यापक जनसमर्थन आपल्याला मिळालं आहे. कार्यकर्त्यांना माझा संदेश हाच आहे की जबाबदारीची जाणीव ठेवली पाहिजे. जिंकल्यानंतर कुठलाही उन्माद नको असंही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलंआहे.

## लोकशाहीच्या नावानं चांगभलं !

आपला देश १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला. देशात लोकशाही कार्यपध्दत अवलंबण्यात आली. शासन , प्रशासन आणि न्यायसंस्था यांनी जनहिताचे निर्णय घ्यायचे आहेत, असे सर्वमतांनी मान्य करण्यात आले. शासनाने कायदे करावेत, त्या नियमांची जनतेसाठीच प्रशासनाने अंमलबजावणी करावी आणि त्यात काही कायदेशीर प्रश्न निर्माण होतील त्यावर निकाल आणि ते योग्यपद्धतीने होतात का? की त्याचे पालन होत आहे का? हे न्यायव्यवस्था पाहात असते. लोकशाही ही अब्राहम लिंकनच्या म्हणण्याप्रमाणे लोकांनी, लोकांसाठी, लोकांच्या माध्यमातून चालवलेली राज्य, देश चालवण्याची व्यवस्था असते. जनता आपले प्रतिनिधी निवडते आणि आपल्या सामाजिक व्यवस्थेसाठी त्यांना निर्णय घ्यायला अधिकार देत असते. मूलतः निवडून दिलेला प्रतिनिधी आपला प्रमुख नेता निवडतो, ज्यांना आपण पंतप्रधान, मुख्यमंत्री म्हणतो..ते जनतेच्या दृष्टीने "उपभोगशून्य स्वामी" असला पाहिजे. समन्वय, विरोधी पक्षाच्या मताचा आदर, विधायक,रचनात्मक आणि सकारात्मक समाजकारण - राजकारण करणे, हा सगळ्याच राजकीय पक्षाकडून अपेक्षित आहे.

कुठे नेऊन ठेवला महाराष्ट्र माझा ? : दरम्यान, मतदान दिवसाच्या दुपार पर्यंतच्या मतदानाची, मतदारांची परिस्थिती पहिली तर कुठे नेऊन ठेवला महाराष्ट्र माझा असेच म्हणावे लागेल. मतदारांचे हाल मुंबईत सुरु आहे. मतदान केंद्र एकीकडे, मतदार दुसरीकडे , परस्पर केलेल्या दुरुस्त्या, नाव , लिंग, प्रभागांची अदलाबदल, शाईचा मुद्दा, दोनदा नोंदवलेली नावे या सगळ्यात मतदार अगोदर त्रासला नंतर चिडला आहे. त्याच्याशी थट्टा चालवली आहे, अशी त्याची भावना झाली आहे. निवडणूक आयोग या सगळ्यामुळे पक्षपाती आहे, असे वाटावे असे वातावरण आहे. राज्यकर्ते किंवा शासक सत्ता ताब्यात राहावी, म्हणून असे वागणार असे अधोरेखित होत असताना विरोधक एकजुटीने, एका दिलाने फार काही करताना दिसत नाही. त्यांचा निवडणुकीच्या प्रक्रियेचा अभ्यास नाही. भाजपला टार्गेट करण्याच्या नादात आयोगाला ज्या प्रकारे प्रश्न विचारले पाहिजेत, तो आवाका त्यांचा नाही. अगदी राहुल गांधी यांनी निवडणूक प्रक्रियेतले घोटाळे जाहीर केले, मात्र त्याला ज्या प्रकारे शेवटास न्यायला पाहिजे होते तसे नेले नाही. विषय अर्ध्यात सोडले. नगर पालिका , महापालिका आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुका समोर असताना अत्यंत तडफेने या विषय शेवटास न्यायला पाहिजे होता. मात्र, तसे झाले नाही.

ठाकरे बंधू मराठी, हिंदू,अदाणी , परप्रांतीय, हिंदी सक्ती हे विषय धरून बसले. या विषयात मतदान यंत्रात जी ताकद आहे , मतदार याद्यात जी ताकद आहे, ती त्यांनी ओळखली नाही. निवडणूक आयोगाला या विषयावर कसून धरले पाहिजे होते. न्यायालयात सतत विचारले पाहिजे होते. मात्र केवळ शिव्याशाप देण्यात त्यांनी धन्यता मानली. काँग्रेसने हा विषय जाहीर केला. मात्र, राज्यात फारसा लावून धरला नाही. त्यांचे अंतर्गत मतभेद आणि हर्षवर्धन सपकाळ यांचे पक्षातले एकाकीपण काँग्रेसला संधी असून बळ देणारे ठरणार नाही.

विषय आहे तो निवडणूक प्रक्रियेतल्या गैरव्यवस्थेचा. तसे तर आपल्या देशात निवडणूक हा मोठा विनोद आहे. बोगस मतदार, त्याचे खोटे पत्ते, सभासद करताना नियमांचे उल्लन्घन, विचार विरोधी असेल तर त्यावर खोट्या तक्रारी असे प्रकार हातात सत्ता असताना ते कायम करतात. एखाद्या सहकार, साहित्य संस्थेत घटनाबाह्य संचालकांनी अवैधरित्या निवडणूक घेणे, निवडून न येत संस्थेचे अध्यक्ष होणे, संस्थेच्या घटनेला हरताळ फासणे, मनमानी करत सत्ता हातात ठेवणे, हे आजही घडत आहे. तिथे आर्थिक राजधानीत न घडले तरच नवल! खुज्या मंडळींच्या सावल्या लांब व्हायला लागल्या की समजावे सूर्यास्ताची वेळ जवळ आली आहे, असा सुविचार आहे. आता तो कोणाला संयुक्तिक, लागू होतो आहे हे ज्याचे त्याने ठरवावे आणि अशा लोकशाहीच्या नावाने चांगभलं म्हणावं, हा मतदानाच्या दिवशीचा संदेश म्हणावा लागेल !

# भाजपला विमाननगरचा गड राखण्यात यश

### चारही उमेदवारांनी मिळवला विजय : राष्ट्रवादी काँग्रेसला भाजपचा धोबीपछाड

**पुणे : हॅलो प्रभात**

विमाननगर-लोहगाव-वाघोली प्रभाग क्रमांक तीनमध्ये भाजपच्या चारही उमेदवारांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांचा पराभव करत राष्ट्रवादी काँग्रेसला खिंडार पाडत विजय मिळविल्याने या विजयामुळे भाजपला विमाननगरचा गड राखण्यात यश आले आहे. सात वर्षापूर्वी लोहगावचा तर पाच वर्षापूर्वी वाघोली गावचा महापालिकेत समावेश करण्यात आल्याने नव्यानेच भाजपचे व राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार प्रभाग क्रमांक तीनमधून पालिका निवडणुकीत उतरल्यामुळे प्रत्येक पक्षातील उमेदवारांना नव्यानेच गड सर करणे ही कठीण होते. राष्ट्रवादी काँग्रेसकडून लोहगावचे श्रावणबाळ म्हणून ओळखले जाणारे बंडू खांदवे, सुनील(मास्तर) खांदवे, उज्वला खांदवे व माजी नगरसेविका उषा कळमकर हे पालिका निवडणुकीच्या रिंगणात उभे होते.तर भाजपकडून वाघोली गावचे सुपुत्र व माजी जिल्हा परिषद सदस्य रामभाऊ दाभाडे,अनिल सातव, श्रेयस खांदवे व वडगाव शेरी विधानसभेचे विद्यमान आमदार यांच्या सुनबाई ऐश्वर्या सुरेंद्र पठारे हे पालिका निवडणुकीच्या रिंगणात उभे असताना लोहगाव, सोमनाथनगर, वाघोली व विमाननगर आदी भागाचा प्रभागात समावेश असल्याने प्रभागात लोहगावचा नव्याने समावेश करण्यात आल्याने या प्रभागातील मतदार वर्गाचे असलेले प्रमाण जास्त असल्यामुळे व माजी नगरसेविका उषा कळमकर यांना यापूर्वी नगरसेवक पदाचा अनुभव जास्त असल्याने प्रभागातून राष्ट्रवादी काँग्रेसचे पारडे जड मानले जात होते. मात्र रामभाऊ दाभाडे यांनी ग्रामपंचायतसह व जिल्हा परिषद निवडणुकीचा असलेला अनुभव घेऊन तीन ही उमेदवारांना एकत्र घेऊन निवडणुकीपूर्वीच त्यांनी अनेक कार्यकर्त्यांच्या बैठका घेऊन पक्षाची मोर्चेबांधणी केल्याने त्यांनी केलेल्या या कष्टाचे अखेर त्यांना फळ मिळाले असतानाच त्यांनी त्यांच्यासह इतर तीन उमेदवारांना निवडून आणण्यास सिंहाचा वाटा उचलून महत्वाची भूमिका बजावली असून प्रभागातून रामदास दाभाडे यांच्यासह श्रेयस खांदवे,ऐश्वर्या पठारे व अनिल सातव यांनी पक्षाचा असलेला बालेकिल्ला मजबूत ठेवत प्रभागावर पक्षाचा झेंडा फडकवला असून विशेष करून हे चार ही विजयी उमेदवार प्रथमच प्रभागातील समस्येबाबत पालिकेत आवाज उठविणार आहेत. हे विशेष असून मागील २०१७मध्ये झालेल्या पालिका निवडणुकीत देखील भाजपचे चार ही उमेदवार निवडून आले होते.

हे विशेष असून विमाननगर भागातील मध्यम व उच्चभ्रू सोसायटीतील मतदार वर्ग हा भाजपला मानणारा असलेला वर्ग असल्याचे झालेल्या विजयामुळे सिद्ध झाले होऊन भाजपच्या नव्या चेहरा असलेल्या उमेदवारांनी पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेसचा धोबीपछाड केल्याचे सिद्ध झाले आहे. यावेळी कार्यकर्त्यांकडून गुलाल उधळून व जल्लोष करत नवीन विजयी उमेदवारांचे स्वागत केले.

## 'बिंदिया के बाहुबली सीझन 2' चा ट्रेलर प्रसिद्ध

**पुणे : हॅलो प्रभात**

ॲमेझॉनची विनामूल्य व्हिडिओ स्ट्रीमिंग सर्व्हिस असलेल्या ॲमेझॉन एमएक्स प्लेयरने आज बहुप्रतिक्षित 'बिंदिया के बाहुबली सीझन 2'चा ट्रेलर प्रदर्शित केला. ज्यात चक्रम दावन कुटुंबातील बदलत्या शक्तीची गतिशीलता तसेच वाढत्या अशांततेची झलक दिली आहे. 'बिंदिया' या काल्पनिक शहरावर आधारित, नवीन अध्यायाचा पहिला सीझन जिथे संपला होता, तिथेच दुसरा सुरू होतो. तुरुंगात असलेला बडा दावन प्रतिस्पर्ध्यांशी शांतता भंग करण्याचा प्रयत्न करत असतो. आपला मुलगा छोटे दावन याने आपली पुरुषसत्ताक गादी चालवावी अशी त्याची इच्छा असते. सत्तेचे डाव, विश्वासघात आणि कौटुंबिक उलथापालथीचे चक्र प्रेक्षकांना कुटुंब, राजकारण आणि खोलवरच्या महत्त्वाकांक्षेत गुंतवून ठेवते. या चक्रम नाट्यात घडामोडींवर ताबा नसल्याने पुरेपूर मनोरंजन होते.

## अण्णामलाई यांचा विजयानंतर जल्लोष

**मुंबई : हॅलो प्रभात**

मुंबई महाराष्ट्राचे शहर नाही, तर ते आंतरराष्ट्रीय शहर आहे. मुंबईचा बॉम्बे असा उल्लेख करत वादग्रस्त विधान भाजपाचे नेते के. अण्णामलाई यांनी केले होते. ऐन मुंबई मनपा निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहोचलेला असताना असे विधान केल्यामुळे मनसे अध्यक्ष राज ठाकरे, ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्यासह विरोधकांनी के. अण्णामलाई यांच्यावर टीकेची झोड उठवली होती. यानंतर आता मुंबईत भाजपाला विजयी आघाडी मिळाली असून, ठाकरे बंधूंना मोठा धक्का बसला आहे. मुंबई मनपा निवडणुकीचे बहुतांश निकाल हाती आल्यानंतर आता के. अण्णामलाई यांनी पहिली स्पष्ट प्रतिक्रिया दिली. अण्णामलाई यांच्यावर गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली पाहिजे, अशी मागणी संजय राऊत यांनी केली होती. भाजपचा स्टार प्रचारक मुंबईत येऊन तुमच्या थोबाडीत मारून गेला, त्यावर आता देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्या पक्षाचे काय म्हणणे आहे? फडणवीस म्हणतात; सूर्य-चंद्र-तारे असेपर्यंत मुंबई महाराष्ट्राची असेल. पण, तुमचे नेते मात्र अशी वक्तव्य करतात. असा अण्णा, भन्ना, झंना, कुणी असो त्याच्यावर गुन्हा दाखल व्हायला पाहिजे, त्याला ताबडतोब अटक केली पाहिजे, असे राऊत म्हणाले होते.

## तुरुंगातूनच गाजवले मनपा निवडणुकीचे मैदान

### गंभीर गुन्ह्यातील 'या' उमेदवारांनी उधळला विजयाचा गुलाल

**पुणे : हॅलो प्रभात**

सोलापूर : महानगरपालिकेत प्रभाग क्रमांक २ मधून भाजपच्या शालन शंकर शिंदे यांनी विजय मिळवला आहे. सोलापुरातील मनसे नेते बाळासाहेब सरवदे खून प्रकरणी त्या सध्या तुरुंगात आहेत. तुरुंगात असतानादेखील एका उमेदवाराने विजय मिळविल्याने मोठे आश्चर्य व्यक्त होत आहे. सोलापूर महानगरपालिका निवडणुकीत रेखा सरवदे आणि शालन शिंदे या दोन्ही उमेदवारांनी भाजपकडून उमेदवारी मागितली होती. भाजपने शालन शिंदे यांना उमेदवारी जाहीर केली होती. रेखा सरवदे यांना उमेदवारी मागे घेण्यावरून मोठा राजकीय दबाव निर्माण करण्यात आला.

उमेदवारी अर्ज माघारी घेण्यावरून २ जानेवारी रोजी दुपारी वादास सुरुवात झाली. दोघेही एकाच समाजाचे आहेत, भांडण करू नका, असे अंगात मनसे नेते बाळासाहेब सरवदे यांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला होता. या वादविवादात शालन शंकर शिंदेंच्या कुटुंबातील सदस्यांनी धारदार हत्याराने बाळासाहेब सरवदेला खुपसले होते. त्यातच बाळासाहेब सरवदेचा मृत्यू झाला. या घटनेने सोलापूर सह राज्यातील राजकारण ढवळून निघाले होते. मनसे नेते अमित ठाकरे स्वतः सोलापुरात येऊन सरवदे कुटुंबाची भेट घेऊन संताप व्यक्त केला होता. आता मतदारांनी खून प्रकरणात तुरुंगात असलेल्या शालन शिंदे यांच्या पारड्यात आपलं मत टाकून त्यांना थेट महानगरपालिकेत धाडलं आहे.

पुणे : संपूर्ण राज्याचे लक्ष असलेल्या प्रभाग क्रमांक २३ मधून सोनाली वनराज आंदेकर आणि लक्ष्मी उदयकांत आंदेकर विजयी झाल्या. या दोघीनी तुरुंगातुन निवडणूक लढवली होती. आयुष कोमकर हत्या प्रकरणात दोघी तुरुंगात आहेत. सध्या त्या येरवडा कारागृहात न्यायालयीन कोठडीत आहेत. आंदेकर कुटुंबियांना विशेष न्यायालयाने निवडणूक लढवण्याची परवानगी दिली. आता यांच्या विजयानंतर पुण्यात गुन्हेगारी कमी होईल की आणखीच वाढेल असा सवाल अनेक जण उपस्थित करत आहेत.

जळगाव : महानगरपालिकेच्या निकालाने संपूर्ण राज्याचे लक्ष वेधून घेतले आहे. या निवडणुकीत 'कोल्हे पॅटर्न' चर्चेत आला आहे. बोगस कॉल सेंटर चालविल्याच्या आरोपावरुन अटकेत असलेले माजी महापौर शिवसेना (शिंदे गट)चे नेते ललित कोल्हे यांनी तुरुंगातूनच प्रभाग क्र. ११ मधून निवडणूक लढवत आपला विजय नोंदवला आहे. केवळ ललित कोल्हेच नाही, तर त्यांची आई सिंधुताई कोल्हे आणि मुलगा पियुष कोल्हे यांनीही विजयाचा गुलाल उधळला आहे. माहितीनुसार, विजयी उमेदवार ललित कोल्हे हे नाशिकमधील कारागृहामध्ये आहेत.

जालना : सर्वात खळबळजनक निकाल जालन्यात पाहायला मिळाला. पत्रकार गौरी लंकेश हत्या प्रकरणातील आरोपी असलेला श्रीकांत पांगारकर जालना महानगरपालिकेच्या निवडणुकीत विजयी झाला आहे. श्रीकांत पांगारकरने जालना महानगरपालिकेच्या वॉर्ड क्रमांक १३ मधून अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवली होती.

ऑगस्ट २०१८ मध्ये दहशतवादविरोधी पथकाने (ATS) मुंबईनजिकच्या नालासोपाऱ्यातून क्रूड बॉंब, देशी बनावटीच्या बंदुका यांच्यासह मोठी स्फोटक सामग्री हस्तगत केली होती. या प्रकरणाच्या चौकशीदरम्यान डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या मारेकऱ्यांविषयी माहिती मिळाली होती. याच प्रकरणी श्रीकांत पांगारकर या शिवसेनेच्या जालन्याच्या माजी नगरसेवकालाही दहशतवादविरोधी पथकाने (ATS) अटक केली होती.

पांगारकर हे पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्त्या गौरी लंकेश यांच्या हत्येप्रकरणातील आरोपी असून, काही दिवसांपूर्वीच त्यांची जामिनावर सुटका झाली होती.

## गणेश नाईकांचा एकनाथ शिंदेंना धक्का

**मुंबई : हॅलो प्रभात**

■ काबीज केली एकहाती सत्ता

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि भाजपचे मंत्री गणेश नाईक यांच्या वादामुळे चर्चेत आलेल्या नवी मुंबई महापालिकेमध्ये भाजपने स्पष्ट बहुमताच्या दिशेने वाटचाल केली आहे. भाजप 72 जागांवर आघाडीवर असून शिंदेंची शिवसेना केवळ 28 जागांवर आघाडीवर आहेत. त्यामुळे गणेश नाईकांनी म्हटल्याप्रमाणे, त्यांनी एकनाथ शिंदे यांचा 'टांगा पलटी' केल्याचं दिसून आलं. या विजयानंतर भाजपकडून नवी मुंबईत टांगा पलटी झालेली बॅनरबाजी लावून शिवसेना शिंदे गटाला डिवचण्यात आलं आहे.

भाजपने नवी मुंबई महापालिकेची सत्ता काबीज केल्यानंतर शिंदे गटाला डीवचणारी बॅनरबाजी केली आहे. नवी मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीचा निकाल जवळपास स्पष्ट झाला असून, भारतीय जनता पार्टीने एकहाती सत्ता काबीज केल्याचे चित्र आहे. मागच्या 15 दिवसांमध्ये शिंदे गट आणि भारतीय जनता पार्टीमध्ये अनेक आरोप प्राप्तरोपांच्या फैरी झाडल्या गेल्या. यावेळी टांगा पलटी, घोडे बेपत्ता यावर प्रचंड मोठ्या प्रमाणामध्ये गदारोळ आपल्याला पाहायला मिळालं. त्याचाच धागा पकडत आज भारतीय जनता पार्टीने विजय मिळवल्यानंतर नवी मुंबई परिसरामध्ये टांगा पलटी झाल्याचे बॅनर्स झळकावले आहेत. एकूणच शिंदे गटाला डिवचनारी बॅनर्स लावले आहेत. नवी मुंबईवर सत्ता मिळवण्यासाठी भाजप आणि शिंदेंच्या शिवसेनेने जोरदार ताकद लावल्याचं दिसून आलं. त्यातून एकनाथ शिंदे आणि गणेश नाईक यांच्यामध्ये जोरदार शाब्दिक युद्धही झाल्याचं दिसून आलं. एकनाथ शिंदे यांनी गणेश नाईकांवर भ्रष्टाचाराचा आरोप केला, तर गणेश नाईकांनीही त्याला प्रत्युत्तर देत शिंदेंना आव्हान दिलं.

### पुण्यात 'राष्ट्रवादीला मत म्हणजे भाजपला मत' हे

# समीकरण मांडण्यात काँग्रेसला अपयश

### पुण्यात काँग्रेस अंतर्गत उणिवा, चुकीची रणनीती आणि विसंवादाचा फटका

**पुणे : हॅलो प्रभात**

महापालिका निवडणुकीत आतापर्यंत समोर आलेल्या आकडेवारीनुसार २ काँग्रेसला जागा मिळाल्या. त्यामुळे गेल्या वेळेच्या तुलनेत काही जागा वाढल्या तरी अपेक्षित यश मिळाले नाही. अंतर्गत उणिवा, चुकीची रणनीती आणि संवादाच्या अभावामुळे अपेक्षित यश मिळविता आले नाही. आघाडीतील उद्धवसेना आणि मनसेची न मिळालेली साथ तसेच राष्ट्रवादीसोबत न जाता एकप्रकारे भाजपलाच अप्रत्यक्षरीत्या मदतच केल्याचे बोलले जात आहे.

'राष्ट्रवादीला मत म्हणजे भाजपला मत' हे समीकरण मांडण्यात अपयश महाविकास आघाडीच्या राजकारणात पुण्यातील मतदार संभ्रमात होता. राष्ट्रवादी काँग्रेसला दिलेले मत अप्रत्यक्षपणे भाजपला फायदेशीर ठरू शकते, ही भूमिका काँग्रेस प्रभावीपणे मतदारांपर्यंत पोहोचवू शकली नाही. भाजपविरोधी मतांचे एकत्रीकरण करण्यासाठी आवश्यक असलेली वैचारिक स्पष्टता आणि आक्रमक प्रचाराचा अभाव स्पष्टपणे जाणवला. परिणामी, विरोधी मतांचे विभाजन झाले आणि त्याचा थेट फटका काँग्रेसला बसला. महाविकास आघाडीचा घटक असतानाही पुणे शहरात तब्बल २४ ठिकाणी उद्धवसेनेविरोधात उमेदवार देण्यात आले. या निर्णयामुळे आघाडीतील एकजूट कागदापुरतीच असल्याचे चित्र मतदारांसमोर गेले. 'आघाडी आहे की नाही?' असा प्रश्न सामान्य मतदारांना पडला आणि त्याचा फायदा थेट भाजपला झाला. स्थानिक पातळीवरील समन्वयाचा पूर्ण अभाव हा काँग्रेसच्या राजकीय अपरिपक्वतेचा नमुना ठरला.

पुण्यात काँग्रेसला नवे, ऊर्जावान चेहरे पुढे आणण्यात अपयश आले. तसेच अन्य पक्षांतून प्रभावी नेते आयात करण्यातही पक्ष अपयशी ठरला. परिणामी, अनेक मतदारसंघांत जुने, थकलेले चेहरेच समोर आले. बदलाची अपेक्षा असलेल्या मतदारांना काँग्रेसकडून काहीच नवे दिसले नाही. भाजप आणि अन्य पक्षांनी नव्या चेहऱ्यांवर भर दिला, तर काँग्रेस मात्र जुन्याच चौकटीत अडकून राहिली. याला अपवाद केवळ प्रशांत जगताप ठरले. त्यांनी आपल्या प्रभागात स्वत:सह आणखी एकाला निवडून आणले.

पक्षांतर्गत गटबाजी, नेतृत्वावरून कुरघोडी आणि समन्वयाचा अभाव यामुळे काँग्रेसची संघटना कमकुवत झाली. अनेक दिग्गज नेत्यांना आपले पारंपरिक बालेकिल्ले शाबूत ठेवता आले नाहीत. स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये नाराजी होती, ती वेळेत दूर करण्यात नेतृत्व अपयशी ठरले. 'पक्षासाठी काम करण्यापेक्षा स्वतःसाठी राजकारण' अशी प्रतिमा निर्माण झाली. राष्ट्रवादी काँग्रेससोबत आघाडी करण्यात काँग्रेसला अपयश आले. निवडून आलेल्या उमेदवारांच्या आघाडीची तुलना काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांची मतांशी केल्यास त्यांची बेरीज जास्त आहे. त्यामुळे आघाडी न झाल्याचा फायदा भाजपला झाला आहे. पुण्यात काँग्रेसने उद्धव ठाकरे यांच्या उद्धवसेना आणि मनसेसोबत समन्वय साधण्याचा प्रयत्न केला, मात्र या प्रयत्नातून अपेक्षित राजकीय लाभ मिळालेला दिसला नाही. उलटपक्षी, या आघाड्यांमुळे काँग्रेसची स्वतंत्र ओळख अधिकच धूसर झाली आणि मतदारांमध्ये संभ्रम वाढला. उद्धवसेना व मनसेसोबतची जवळीक ही तात्त्विक की केवळ निवडणुकीपुरती, याबाबत काँग्रेसकडून स्पष्ट भूमिका मांडली गेली नाही. भाजपविरोधात एकत्र लढण्याचा संदेश एकसंधपणे मतदारांपर्यंत गेला नाही. परिणामी, मतदारांना ही आघाडी 'संधिसाधू' वाटली, ठोस राजकीय पर्याय वाटला नाही.

### मोठ्या नेत्यांची प्रचारात अनुपस्थिती

**पुण्यात काँग्रेसच्या उमेदवारांसाठी प्रचार करताना पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाची भूमिका अत्यंत मर्यादित राहिली. प्रदेशाध्यक्षांची केवळ एकच सभा वगळता, राष्ट्रीय किंवा राज्य पातळीवरील कोणत्याही मोठ्या नेत्यांनी पुण्यात उमेदवारांच्या प्रचारासाठी ठोस, प्रभावी सभा घेतल्या नाहीत. या अनुपस्थितीमुळे काँग्रेसची निवडणूक लढाई स्थानिक कार्यकर्त्यांच्या खांद्यावरच राहिली. मोठ्या नेत्यांच्या सभांना मिळणारी गर्दी, निर्माण होणारी राजकीय हवा याचा काँग्रेसला लाभ मिळाला नाही. भाजप व इतर पक्षांनी स्टार प्रचारकांचा प्रभावी वापर करून वातावरण तापवले असताना, काँग्रेसकडे नेतृत्वाचा चेहरा आणि आक्रमक प्रचाराचा सूर दिसला नाही. यामुळे मतदारांमध्ये 'पक्षच या निवडणुकीत गंभीर नाही' अशी भावना निर्माण झाली. परिणामी, हा नेतृत्वाचा अभावही काँग्रेसच्या पराभवाला कारणीभूत ठरला.**

नवे विचार...नवी सुरुवात
दैनिक हॅलो प्रभात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक , मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली - ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून **दैनिक हॅलो प्रभात**, कार्यालय, **स.न.१४/१५/२/३, फ्लॅट नं.२०, शिवपुष्प, ए पार्क, वडगाव बु., पुणे- ४११०४१. (महाराष्ट्र)** येथून प्रसिद्ध केले.
■ **पुणे कार्यालय :** १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे-४११०३० ■ **पुणे संपर्क : ८५५१०५५११३**
■ **कोल्हापूर कार्यालय :** एस ९४६, GF-7, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर-४१६००२
■ **सांगली मुख्य कार्यालय :** कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली. ■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत)

■ **मुख्य संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर** ■ **संपादक : संजीव शाळगावकर**

हॅलो प्रभात
MY CITY ३
शनिवार, दि. १७ जानेवारी २०२६

## आमदार महेश लांडगे यांचे नेतृत्व सिद्ध

**पिंपरी : हॅलो प्रभात** : पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीत प्रचारादरम्यान उपमुख्यमंत्री अजित पवार आणि भोसरीचे आमदार महेश लांडगे यांच्यात 'अरे तुरे'पर्यंत मजल पोहोचली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनंतर आमदार लांडगे यांनी प्रचाराच्या काळात नमते घेतले. मात्र, निवडणूक निकालाद्वारे महापालिकेत आमदार लांडगे यांचे नेतृत्त्व सिद्ध झाले आहे. या निवडणुकीत आमदार लांडगे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना थेट आव्हान दिले. पवारांच्या प्रत्येक आरोपाला सडेतोडपणे उत्तर दिले. सूक्ष्म नियोजन करून भाजपचे सर्वाधिक नगरसेवक निवडून आणले. महापालिकेत भाजपची सत्ता येण्यात आमदार लांडगे यांचे मोठे योगदान असून, त्यांनी आपले नेतृत्व सिद्ध केले. आमदार लांडगे यांच्यावर टीका करताना पवार यांच्या भाषेचा स्तर घसरला. गल्लीतील दादा, नासका आंबा, भंगार चोर, जमीन खरेदी, संपत्तीत वाढ, भ्रष्टाचाराचा राक्षस, फेकून देईन अशी भाषा वापरली. महापालिकेच्या ठेवी मोडल्या, कर्जबाजारी केली. विकास कामात भ्रष्टाचार केल्याचे मुद्दे पवार यांनी भाषणात आक्रमकपणे मांडले. मात्र, या प्रचाराला मतदारांनी नाकारल्याचे स्पष्ट झाले. भाजपकडून आमदार लांडगे यांनी अजित पवार यांना तितक्याच आक्रमकपणे एकेरी भाषेत उत्तर दिले. भाजपच्या तीन आमदारांनी अजित पवार यांना उत्तर दिले नाही. आमदार लांडगे यांनी एकट्याने खिंड लढवत हुशारीने स्थानिक विरुद्ध बारामतीचा कारभारी हा मुद्दा प्रचाराच्या अग्रस्थानी आणला. 'नको बारामती, नको भानामती', 'शहराचा कारभारी शहरातीलच' असे फलक लाऊन नागरिकांचे लक्ष वेधले.

### थोडक्यात पण महत्वाचे

## कोल्हापूरात राजकीय भूकंप; 'उबाठा'च्या पदाधिकाऱ्याचा राजीनामा

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

कोल्हापूर महानगरपालिका निवडणुकीच्या निकालानंतर ठाकरेंच्या शिवसेनेत मोठी घडामोड घडली आहे. निवडणुकीत ठाकरेंच्या शिवसेनेला अपेक्षित यश न मिळाल्याने, त्याची 'नैतिक जबाबदारी' स्वीकारून उबाठा पक्ष कोल्हापूर शहर प्रमुख सुनील मोदी यांनी आपल्या पदाचा तडकाफडकी राजीनामा दिला आहे. त्यांनी आपला राजीनामा थेट पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याकडे पाठवला असून, यामुळे स्थानिक राजकारणात चर्चेला उधाण आले आहे. आपल्या राजीनामा पत्रात सुनील मोदी यांनी पराभवाच्या कारणांचा पाढाच वाचला आहे. "निवडणूक प्रक्रियेत स्थानिक पातळीवर झालेली गटबाजी, समन्वयाचा अभाव आणि संघटनात्मक दुर्लक्ष यामुळे पक्षाचे नुकसान झाले," असे त्यांनी स्पष्टपणे नमूद केले. वारंवार वरिष्ठांच्या निदर्शनास या बाबी आणूनही संघटनात्मक ताकद एकवटली नसल्याची खंतही त्यांनी यावेळी व्यक्त केली. सुनील मोदी यांनी या पत्रात काँग्रेस नेते आमदार सतेज पाटील यांच्या भूमिकेचे कौतुक केले आहे. "बंटी पाटील यांनी युतीधर्म पाळत शिवसेनेच्या उमेदवारांना निवडून आणण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले," असे म्हणत मोदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे. पदाचा त्याग करताना सुनील मोदी यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. "पदावर राहून स्पष्टीकरण देण्यापेक्षा जबाबदारी स्वीकारणे ही शिवसेनेची संस्कृती आहे. मी पद सोडले असले तरी माझी निष्ठा कमी झालेली नाही. यापुढेही कोणत्याही पदाविना मी एक सामान्य शिवसैनिक म्हणून 'मातोश्री'शी एकनिष्ठ राहून काम करत राहीन," असेही त्यांनी पत्राच्या शेवटी म्हटले आहे.

## सुषमा अंधारेंची उद्धव ठाकरेंसाठी फेसबुक पोस्ट

**पुणे : हॅलो प्रभात**

राज्यातील महानगरपालिका निवडणुकांचे निकाल समोर आले. मुंबई महानगरपालिका निवडणुकीत भाजपाला मोठं यश आले, तर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने जोरदार लढत दिला. या निवडणुकीत महायुतीने ११६ जागांवर तर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि मनसेने ७२ जागेवर विजय मिळवला. दरम्यान, या निकालावरुन ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी फेसबुक पोस्ट केली. अंधारे यांनी सोशल मीडियावर केलेल्या फेसबुक पोस्टमधून सध्याच्या राजकीय घडामोडींवर परखड भाष्य केले आहे. ठाकरे गटातील नेते शिंदेसेना किंवा भाजपमध्ये गेल्यानंतर सातत्याने "ठाकरेंना धक्का" अशा बातम्या प्रसिद्ध केल्या जात होत्या, यावरुन अंधारे यांनी भाष्य केले. निवडणूक निकालांकडे पाहता वास्तव वेगळे असल्याचे सांगत सुषमा अंधारे यांनी म्हटले आहे की, ठाकरेंच्या जीवावर राजकारणात बळावलेले काही नेते जरी पक्ष सोडून गेले असले, तरी सर्वसामान्य शिवसैनिकांनी जीवाचे रान करून पुन्हा पक्षाची ताकद उभी करण्याचा प्रयत्न केला आहे. या शिवसैनिकांच्या मेहनतीचे प्रतिबिंब निकालांतून स्पष्टपणे दिसून येते, असा दावा त्यांनी केला आहे. सदा सरवणकर यांची दोन्ही मुले, रवींद्र वायकर यांची मुलगी तसेच राहुल शेवाळे यांच्या भावजय यांचा दारुण पराभव झाल्याचा उल्लेख करत, त्यांच्या पक्षांतरामुळे ठाकरेंना फारसा फरक पडलेला नाही, हेच यातून स्पष्ट होते, असे अंधारे यांनी नमूद केले आहे. या निवडणुकीत ठाकरेंनी 'मशाल' या चिन्हावर निवडणूक लढवली. मुंबईकरांनी 'धनुष्यबाण' नाकारून 'मशाल' स्वीकारली, याचा अर्थ मतदारांसाठी चिन्ह कोणते आहे यापेक्षा ते चिन्ह ठाकरेंकडून आले आहे का, हे अधिक महत्त्वाचे ठरले असल्याचे त्यांनी म्हटले आहे. भाजपाने 'फोडा आणि राज्य करा' या धोरणातून एकनाथ शिंदे यांना वेगळे केल्याचा आरोप करत, शिंदे आणि उद्धव ठाकरे जर एकत्र लढले असते, तर भाजपची परिस्थिती अधिक कठीण झाली असती, असे मतही त्यांनी व्यक्त केले. तसेच काँग्रेस आणि इतर पक्षांना मिळालेल्या जागा पाहता भाजपला निर्विवाद यश मिळालेले नाही, असेही त्या म्हणाल्या. पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपाने अजित पवार यांच्यासोबतही हाच प्रयोग केल्याचा आरोप करत, दोन पवारांमधील वादाचा राजकीय लाभ भाजपाने उचलल्याचे सुषमा अंधारे यांनी आपल्या पोस्टमध्ये नमूद केले आहे. शिंदे आणि अजित पवार यांना ज्या दिवशी हे कटू सत्य उमगेल, तो दिवस त्यांच्यासाठी सुदिन ठरेल, असेही त्यांनी शेवटी म्हटले आहे.

# अनिल टिंगरेंची विजयी हॅट्रीक

### धानोरी-कळस प्रभागात भाजपच किंगमेकर : चार पैकी तीन भाजपचे उमेदवार विजयी

■ राष्ट्रवादीच्या रेखा टिंगरेंचा विजयी चौकार

**पुणे : हॅलो प्रभात**
सोमनाथ साळुंके

धानोरी-कळस-लोहगाव प्रभाग क्रमांक एकमध्ये झालेल्या पालिका निवडणुकीच्या अटीतटीच्या लढतीत भाजपचे अनिल टिंगरे यांनी विजयाची हॅट्ट्रिक करत इतर दोन उमेदवार निवडून आणण्यास सिंहाचा वाटा उचलल्यामुळे प्रभागात भाजपच किंगमेकर ठरला असून राष्ट्रवादीच्या एकमेव रेखा टिंगरे यांनी विजयाचा चौकार मारत विजय साकार केला आहे.

काल शांततेत धानोरी-कळस_लोहगाव प्रभाग क्रमांक एक मधील मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला होता. त्यातच आज शुक्रवार (दि.१६) रोजी खराडी येथील कै. राजाराम भिकू पठारे येथील विद्यालयात मतमोजणी असल्यामुळे या ठिकाणी निवडणूक आयोगाच्या वतीने मतमोजणीसाठी चोख बंदोबस्त लावून मतमोजणीस सुरुवात करण्यात आल्यावर प्रथम धानोरी प्रभागाची मतमोजणी करण्यात आल्यावर मत केंद्राच्या बाहेर विविध पक्षातील कार्यकर्त्यांची मोठ्या प्रमाणात गर्दी जमली होती. धानोरी प्रभागात भाजपकडून अनिल उर्फ बॉबी टिंगरे हे सर्वसाधारण पुरुष गटातून उभे असताना त्यांच्या विरोधात राष्ट्रवादीचे शशिकांत टिंगरे हे निवडणुकीच्या रिंगणात उभे होते.

त्यांमुळे मतदारांना देखील प्रभागात टिंगरे विरुद्ध टिंगरे असाच पालिका निवडणुकीचा सामना पाहायला मिळाल्यावर बॉबी टिंगरे यांनी त्यांचे विरोधक शशिकांत टिंगरे यांना काव्रजचा घाट दाखवत प्रभागात विजयच नाही तर विजयाची हॅट्ट्रिक करत विजय साकारला.

तर ओबीसी महिला गटातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या रेखा टिंगरे यांच्या विरोधात भाजपच्या वंदना खांदवे ह्या निवडणुकीच्या रिंगणात असताना टिंगरे यांनी खांदवे यांचा पराभव करत चौथ्यांदा विजयी होण्यास खारीचा वाटा उचलला असला तरी पण त्यांचे इतर तीन उमेदवार निवडून आणण्यास त्या असमर्थ ठरल्या.तर अनुसूचित जाती_जमती(एसटी) प्रवर्गातून भाजपच्या संगीता दांगट यांच्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून नूतन प्रताप ह्या निवडणुकीच्या रिंगणात असताना दांगट यांनी नूतन प्रताप यांचा पराभव करून प्रभागात प्रथमच विजयी होण्याचा मान मिळवला. विशेष करून दांगट यांची ही पहिलीच निवडणूक असून त्यांनी पहिल्या निवडणुकीत विजय साकार केल्यामुळे प्रभागातील कार्यकर्त्यांसह मतदार वर्गाकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. याबरोबरच अनुसूचित जाती प्रवर्गातून माजी नगरसेवक राहुल भंडारे यांच्या पत्नी अश्विनी भंडारे यांना भाजपकडून उमेदवारी देण्यात आली होती.तर त्यांच्या विरोधात राष्ट्रवादीच्या आरती चव्हाण ह्या निवडणुकीच्या रिंगणात असतानाच विधेश करून अश्विनी भंडारे यांची देखील पहिलीच निवडणूक असून त्यांना हा प्रभाग नवखा असताना देखील त्यांनी प्रभागातून विजय साकार केल्याने नागरिकांकडून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत होता. सकाळपासून दोन्ही पक्षाचे कार्यकर्ते मतदान केंद्राबाहेर तळ ठोकून होते. निवडणुकीचा निकाल जाहीर होताच भाजपच्या कार्यकर्त्यांनी गुलालाची उधळण फटाक्याची आतषबाजी करत विजयाचा जल्लोष साजरा केला. यावेळी मतदान केंद्राच्या बाहेर पक्षाचे झेंडे फडकावत कार्यकर्त्यांनी आपला आनंद साजरा केला.

**गेल्या दहा वर्षाच्या कालावधीत प्रभागातील जनतेचे असलेले विविध प्रश्न सोडवण्यास प्राधान्य देऊन केलेल्या विकासकामामुळेच मतदार वर्गांनी माझ्यावर विश्वास ठेवून मला तिसऱ्यांदा पालिका सभागृहात जाण्याची संधी दिली असून मी आत्तापर्यंत केलेल्या कामाची पावती असून जनतेच्या विश्वासाला तडा जाऊन न देता प्रभागातील शिल्लक असलेली विकासकामे इतर दोन नगरसेवकांच्या माध्यमातून सोडवण्यास प्राधान्य देणार.**

**-अनिल उर्फ बॉबी टिंगरे,नवनिर्वाचित नगरसेवक**

## घड्याळ्याचे काटे उलटे फिरले, तुतारीचा आवाज बंद

**पुणे : हॅलो प्रभात**

संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागून असलेल्या पुणे महापालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने दणदणीत विजय मिळवला, तर उपमुख्यमंत्री अजित पवार व ज्येष्ठ शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा युतीला दारुण पराभवाचा सामना करावा लागला. आतापर्यंतच्या निकालानुसार भाजपाने पुण्यातील १६५ पैकी तब्बल ११० जागांवर विजय मिळवून बहुमताचा आकडा पार केला आहे. दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या दोन्ही गटांना केवळ २१ जागांवरच समाधान मानावे लागताना दिसून येत आहे. त्याशिवाय काँग्रेसचे आठ जागांवरील उमेदवार आघाडीवर आहेत. विशेष बाब म्हणजे- पुण्यात शिंदे व ठाकरे गटाला आतापर्यंत भोपळाही फोडता आलेला नाही. या अभूतपूर्व यशानंतर पुण्यातील स्थानिक नेत्यांनी बॅनरबाजी करून उपमुख्यमंत्री अजित पवार यांना डिवचले आहे. पुणे शहरात काढलेल्या विजयी मिरवणुकीत भाजपाचे कार्यकर्ते बॅनर घेऊन सामील झाले होते. 'ओ दादा... पुण्यात अण्णाच भारी', 'पुण्याचा धुरंधर आपला मुरलीधर', 'टांगा पलटी अन् घोडे फरार', 'घड्याळ्याचे काटे उलटे फिरले, तुतारीचा आवाज बंद', अशा आशयाचा मजकूर या बॅनर्सवर छापण्यात आला होता.

## कामं हरली, पैसा जिंकला : आबा बागुल यांची खंत

**पुणे : हॅलो प्रभात**

पुणे महानगरपालिका निवडणुकीतील निकाल हे पूर्णतः अनपेक्षित असून, आजवर केलेली विकासकामे हरली आणि पैसा जिंकला, अशा शब्दांत शिवसेनेचे माजी उपमहापौर व प्रभाग क्रमांक ३६ सहकारनगर-पद्मावतीचे अधिकृत उमेदवार आबा बागुल यांनी आपल्या पराभवाबद्दल तीव्र खंत व्यक्त केली आहे. धक्कादायक पराभवानंतर प्रतिक्रिया देताना आबा बागुल म्हणाले की, लोकशाही व्यवस्थेवरील नागरिकांचा विश्वास कमी होत चालल्याचे या निवडणुकीतून पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. निवडणूक जाहीर झाल्यापासून मतदानाच्या दिवसापर्यंत सर्वत्र गोंधळ, तणाव, पैशाचा खुलेआम वापर आणि सत्तेचा गैरवापर पाहायला मिळाला.

सुज्ञ मतदार या प्रकारांना आळा घालतील, अशी अपेक्षा होती. मात्र, अखेरीस पैसा जास्त प्रभावी ठरला, अशी खंत त्यांनी व्यक्त केली."मी सलग सहा वेळा निवडून आलो आहे. वॉर्ड बदलले, प्रभाग रचना बदलली, तरीही मी केवळ विकासकामांच्या जोरावर निवडून आलो. मात्र, यंदा सातव्यांदा निवडणुकीला सामोरे जाताना जो पराभव स्वीकारावा लागला, तो पूर्णतः अनपेक्षित आहे,असे बागुल म्हणाले. सत्ताधाऱ्यांकडून कोणत्याही प्रकारचे षडयंत्र रचले जाऊ शकते, यावरच या निकालाने शिक्कामोर्तब झाल्याचा आरोप त्यांनी केला. यंत्रणांचा गैरवापर करून, मोठ्या प्रमाणावर पैशाचा पाऊस पाडत विकासकामांना दुय्यम स्थान देण्याची खेळी यशस्वी झाली, ही लोकशाहीच्या दृष्टीने अत्यंत दुर्दैवी बाब असल्याचे त्यांनी नमूद केले.आपल्या राजकीय प्रवासाचा उल्लेख करताना आबा बागुल म्हणाले की, अपक्ष म्हणून पहिली निवडणूक जिंकल्यानंतर त्यांनी सातत्याने विकासकामांवर भर दिला. मात्र यंदाचा पराभव हा अपेक्षित नसून, तरीही विकासकामांवर विश्वास ठेवून आपल्याला मतदान करणाऱ्या सुज्ञ मतदारांचे त्यांनी मनापासून आभार मानले.

## कुर्डुवाडी न.पा.उपगराध्यक्ष पदी सविता जगताप

**कुर्डूवाडी : हॅलो प्रभात**

कुर्डूवाडी नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षपदी राष्ट्रवादीच्या सविता सुभाष जगताप यांची निवड झाली.स्वीकृत नगरसेवकपदी उद्धवसेनेच्या धनंजय डिकोळेंची चौथ्यांदा तर राष्ट्रवादीच्या वसीम मुलाणी यांची पहिल्यांदा निवड झाली आहे.येथील के.एन.भिसे सभागृहात शुक्रवार दि.१६ जानेवारी रोजी दुपारी २ वाजता उपनगराध्यक्ष,स्वीकृत नगरसेवक निवडीसाठी आयोजित केलेली पहिली बैठक पीठासीन अधिकारी जयश्री भिसे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.यावेळी प्रभारी मुख्याधिकारी सचिन तपसे

कार्यालयीन अधीक्षक बापू चोबे, कर निरीक्षक रणजित शिनगारे हे होते

नुकत्याच पार पडलेल्या नगरपरिषद निवडणुकीत उद्धवसेनेच्या नगराध्यक्षपदी जयश्री भिसे निवडून आल्या त्यांचे ५ नगरसेवक व एका अपक्ष नगरसेवकाने पाठिंबा दिल्याने एकूण ६ नगरसेवक झाले तर राष्ट्रवादीचे १३ नगरसेवक निवडून आले तर शिंदेसेनेकडून वनिता सातव एकमेव नगरसेविका निवडून आलेल्या आहेत. नगरपरिषदेत संख्या बळानुसार राष्ट्रवादी व उद्धवसेनेचा प्रत्येकी एक स्वीकृत नगरसेवक होणार हे निश्चित होते उपनगराध्यक्ष पदाच्या निवडीसाठी राष्ट्रवादीकडे स्पष्ट बहुमत असल्याने त्यांचा उपनगराध्यक्ष होणार हे देखील निश्चित होते.

उपनगराध्यक्ष पदासाठी राष्ट्रवादीकडून सविता जगताप यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड झाली तसेच उद्धवसेनेकडून नामनिर्देशन सदस्यांसाठी एकच अर्ज आल्याने डिकोळेची नियुक्ती झाली तर राष्ट्रवादीकडून नामनिर्देशन सदस्यांसाठी नितीन पवार व वसीम मुलाणी यांचा अर्ज दाखल झाला होता परंतु गटनेते समीर मुलाणी यांच्या शिफारसीनुसार वसीम मुलाणी यांच्या नावाला शिक्कामोर्तब झाल्याने ही निवड झाली यानंतर नवनिर्वाचित नगरसेवकांचा सभागृहामध्ये सत्कार करण्यात आला. यावेळी रिपाइंचे सुभाष जगताप, महेश गांधी, बाबासाहेब गवळी, आखलाक दाळवाले,यासीन बहामद, साबीर चाऊस,विशाल गोरे, सोमनाथ गवळी साहिल भिसे आदी मान्यवर उपस्थित होते..

## पुण्यात रवींद्र धंगेकर यांच्या पत्नीचा पराभव

**पुणे : हॅलो प्रभात**

शिवसेना शिंदे गटाचे पुण्यातील फायरब्रँड नेते रवींद्र धंगेकर यांना मोठा धक्का बसला आहे. पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीत त्यांच्या पत्नी प्रतिभा धंगेकर यांचा पराभव झाला आहे. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवार सोनाली आंदेकर यांनी प्रतिभा धंगेकर यांचा पराभव केला आहे. धंगेकर यांनी या निवडणुकीत आपली सर्व ताकद पणाला लावून दिली होती. तरीदेखील त्यांच्या पत्नीला पराभव स्वीकारावा लागल्याने शिंदे गटात नाराजीचे वातावरण पसरले आहे. पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपा व शिवसेना शिंदे गटाने स्वतंत्र उमेदवार उभे केले होते, तर अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने शरद पवारांच्या पक्षाबरोबर युती केली होती. यादरम्यान रवींद्र धंगेकर यांनी पत्नी प्रतिभा आणि चिरंजीव प्रणव या दोघांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवून भाजपापुढे मोठे आव्हान उभे केले रहोते. भाजपाने महापालिका निवडणुकीचे प्रमुख म्हणून माजी सभागृह नेते गणेश बीडकर यांच्यावर संपूर्ण जबाबदारी सोपविली होती.

# फुलेनगर प्रभागात राष्ट्रवादी काँग्रेसची मुसंडी

**पुणे : हॅलो प्रभात**
सोमनाथ साळुंके/कुलदीप घोडके

■ चारही उमेदवारांचा विजयी चौकार : माजी आमदार सुनील टिंगरेच किंगमेकर

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या फुलेनगर_नागपूर चाळ प्रभाग क्रमांक दोनमधील पक्षाच्या चारही उमेदवारांनी विरोधी पक्षातील उमेदवारांना काव्रजचा घाट दाखवत विजयाची मुसंडी मारल्याने मिळालेल्या या विजयामुळे राष्ट्रवादी काँग्रेसने मागील पराभवाचा वचपा काढत प्रभागावर भाजपने वर्चस्व राखण्याचे पाहिलेले स्वप्न धुळीस मिळाले आहे.

नऊ वर्षानंतर पालिका निवडणुकीला मिळालेल्या मुहूर्तामुळे सर्व पक्षातील राजकीय नेत्यांच्या नजरा वडगाव शेरी विधानसभा मतदार संघातील फुलेनगर_नागपूर चाळ या प्रभागाकडे लागली होती.ह्यास कारण ही तसेच असून मतदार संघाचे माजी आमदार व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष सुनील टिंगरे यांचा हा प्रामुख्याने बालेकिल्ला म्हणून हा प्रभाग असल्याने त्यांना या प्रभागातून चारही उमेदवार निवडून आणण्याचे विरोधकांचे त्यांच्यासमोर आव्हान होते.त्यांच्या नेतृत्वाखाली त्यांचे बंधू सुहास टिंगरे,रवि उर्फ हर्षल टिंगरे,शीतल सावंत तर नंदिनी धेंडे हे चार उमेदवार सुनील टिंगरे यांच्या नेतृत्वाखाली हे उमेदवार पालिका निवडणुकीच्या रिंगणात उभे होते.तर या चारही उमेदवारांना भाजपकडून निवडणुकीच्या रिंगणात नव्या चेहऱ्यांना संधी देऊन राहुल जाधव,सुधीर वाघमोडे,अदिती बाबर व रेणुका चलवादी हे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरवले होते.प्रथम एकतर्फी वाटणारी निवडणूक ही ऐन निवडणुकीच्या रणधुमाळीत राष्ट्रवादीच्या दोन इच्छुक उमेदवारांनी भाजपचा झेंडा हातात घेतल्याने प्रतिष्ठेची मानली जात होती.त्यामुळे निवडणुकीत अधिक रंगत आली होती.

प्रभागातून अ गटातून भाजपकडून रेणुका चलवादी व काँग्रेसकडून प्रियांका रणपिसे ह्या दोन पराभूत उमेदवार राष्ट्रवादी काँग्रेसच्या विजयी उमेदवार व माजी नगरसेवक डॉ.सिद्धार्थ धेंडे यांच्या पत्नी नंदिनी धेंडे यांच्या विरोधात निवडणुकीच्या रिंगणात उभ्या होत्या.मात्र धेंडे यांनी दोन्ही उमेदवारांचा पराभव करत प्रथमच पालिका सभागृहात जाण्याचा मान मिळविला.तर ब गटातून राष्ट्रवादी काँग्रेस विजयी उमेदवार रवी उर्फ हर्षल टिंगरे यांना भाजपचे सुधीर वाघमोडे व शिवानी माने या दोन उमेदवारांचे आव्हान असताना पालिका निवडणुकीत प्रथमच उतरलेले रवी टिंगरे यांनी देखील दोन्ही उमेदवारांचे आव्हान मोडीत प्रभागात प्रथमच विजय साकार केला. याबरोबरच पुण्याचे माजी महापौर व दिवंगत भारत सावंत यांच्या सून व सामाजिक कार्यकर्ते अजय सावंत यांच्या पत्नी शीतल सावंत यांनी देखील भाजपच्या अदिती बाबर व काँग्रेसचे कनहर खान यांचा पराभव करून आपली विजयी घोडदौड कायम ठेवली आहे.याबरोबरच सुनील टिंगरे यांचे धाकटे बंधू सुहास टिंगरे हे देखील ड गटातून पालिका निवडणुकीच्या रिंगणात उभे होते.त्यांना देखील भाजपचे राहुल जाधव व उद्धव सेनेचे माजी नगरसेवक सुनील गोगले यांचे कडवे आव्हान असताना देखील टिंगरे यांनी या दोन्ही विरोधी उमेदवारांना काव्रजचा घाट दाखवत विजयाची मुसंडी मारली आहे.राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रभागातून चार ही उमेदवार विजयी झाल्याने कार्यकर्त्यांमध्ये आनंदोत्सव व जल्लोष साजरा करण्यात आला. यावेळी प्रभागात कार्यकर्त्यांनी दुचाकीला पक्षाचे झेंडे लावत रॅली मार्फत आपला विजय साजरा केला. झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या चार ही विजयी उमेदवारांमुळे प्रभागात गुलालाची उधळण व फटाक्याची आतषबाजी करत विजय साकार करण्यात आला.तर भाजपाने या प्रभागावर पुन्हा वर्चस्व राखण्याचे स्वप्न झालेल्या पराभवामुळे धुळीस मिळाले आहे.

**२०१७रोजी झालेल्या पालिका निवडणुकीमध्ये भाजपच्या चारपैकी तीन उमेदवारांनी प्रभागात विजय मिळवून वर्चस्व प्रस्थापित केले होते.तर राष्ट्रवादी काँग्रेसकडून माजी आमदार सुनील टिंगरे हे एकमेव उमेदवार निवडून आले होते.त्यामुळे भाजपच्या बालेकिल्ल्याला सुरुंग लावून प्रभागात पक्षाचे चार ही उमेदवार निवडून आणण्यास सुनील टिंगरे यांना यश आल्याने ते प्रभागातील खऱ्या अर्थाने किंगमेकर ठरले आहेत.**

# चिंचोलीवर भीषण पाणीसंकट

**या साठवण तलावाच्या तळापासून चोहोबाजूने पाणीरोधक कागद टाकण्याचे प्रस्तावीत आहे. मात्र कामच अपुर्ण असल्याने सावलेले पाणी पाझरुन जात आहे. किमान उन्हाळ्यातील भीषणतेचा विचार करुन कागद टाकण्याची प्रक्रिया राबवावी. बरोबरच आणखी पाण्याचे उद्भव शोधावेत, विहिरी, कुपनलिका अधिग्रहित करण्याची प्रक्रिया राबविण्याचे ग्रामस्थांमधून सांगण्यात येत आहे.**

**राहुरी : हॅलो प्रभात**

गेल्या पाच दशकाहून अधिकच्या कालावधीत अव्याहतपणे चिंचोलीकरांची तहान भागविणारी जलसंजीवनी समजल्या जाणाऱ्या विहिरीने हिवाळ्यातच जानेवारी महिन्यात अचानक तळ गाठल्याने पुढच्या भीषण पाणीसंकटाची चाहुल दिली असल्याने ग्रामस्थ हवालदिल झाले आहेत. जलजीवन योजनेचे भिजत घोंगड्याने या पाणीबाणीला आणखी बळकटी दिल्याचे ग्रामस्थांमधून सांगण्यात येत आहे.

सन १९७८-७९ ला सुरु झालेली तालुक्यातील चिंचोलीची पाणीपुरवठा योजना, नगर-मनमाड महामार्गालगत असलेल्या पन्नास साठ फुट विहिरीतून आजतागायत अव्याहतपणे नि बिनदिक्कत सुरु होती नि आहे. गत दोन वर्षापापुर्वी दररोज पाणीपुरवठा करणारी यंत्रणा दोन वर्षापासून दिवसाआड झाली, मात्र आता जानेवारीच्या सुरुवातीलाच पाणीपुरवठा ४ ते ५ दिवसातून करण्याची वेळ ग्रामपंचायतीवर आली आहे. बरोबरच शासनाने मंजूर केलेली चिंचोली व कोल्हार खुर्द साठीची संयुक्त जलजीवन योजना ग्रामस्थांसाठी केवळ मृगजळच ठरली आहे.

तालुक्यातील चिंचोली गावं पूर्वीपासूनचं बागायत व पाणीदार म्हणून ओळख असलेलं. सन १९७८-७९ ला तत्कालीन गाव कारभाकाऱ्यांनी भविष्याचा वेध घेत जिल्हा परिषदेच्या भटारकरवस्ती शाळेलगत विहिर खोदून व एक लाख लिटर क्षमतेची टाकी बांधून, त्याद्वारे नागरिकांना पिण्याच्या पाण्याची पाणीपुरवठा योजना कार्यान्वित केली. त्याकाळी लोकसंख्या होती केवळ हजाराच्या आसपास कालपरत्वे लोकसंख्येत वाढ होत आज सात आठ हजारावर गेली तसतशी पिण्याच्या पाण्याची निकड भासू लागल्याने ग्रामपंचायतीच्या जागेत त्या वेळच्या प्रवरा व आताच्या पद्मश्री विखे पा. कारखान्याच्या माध्यमातून भंडारदरा उजव्या कालव्या लगत साठवण तलाव खोदण्यात आला. त्याचवेळी कोल्हार खुर्द ग्रामपंचायतीला तीस टक्के पाणी देण्याचे धोरण ठरविण्यात आले. हा तलाव कालव्याच्या आवर्तनातून भरुन घेत पाईपद्वारे पाणीपुरवठा विहिरीलगत खोदलेल्या खड्डात सोडण्यात येतो. पाझराद्वारे विहिरीत आलेल्या पाण्यातून नागरिकांची तहान भागविली जाई. बरोबरच साठवण तलावात विहिर व कुपनलिका घेतली गेली. मात्र साठवण तलावातील पाणी संपल्यानंतर विहिरही कोरडी होत असल्याने फक्त एका कुपनलिकेद्वारे महामार्गाच्या दक्षिणेकडील नागरिकांची तहान भागविली जाते. त्यानंतर माध्यमिक विद्यालयालगत विहिर खोदण्यात आली. मात्र ती कोरडीठाक असल्याने ती उपयोगाविना पडून आहे.

सध्या गावात जवळपास ६५० च्या वर नळजोडण्या आहेत. त्यात कुपनलिकेवर ३५० च्या आसपास तर विहिरीवर तीनशेच्या जवळपास नळजोडण्यांद्वारे पाणी पुरविले जाते. कुपनलिकेद्वारे पुरवठा केले जात असलेले पाणी तीन ते चार दिवसातून एकेका जलवाहिनेला सोडण्यात येते तर विहिरीतील पाणी आताच्या जानेवारी महिन्यातच तीन ते चार दिवसाआड सोडले जाते. गत वर्षी कमी पाऊस होवूनही दिवसाआड पाणीपुरवठ्यात व्यत्यय येत नसे. इतक्या पाण्याची उपलब्धता विहिरीत होती. असे नागरिकांचे म्हणणे आहे. मात्र यंदा पाऊस समाधानकारक होवूनही विहिरीने अचानकच जानेवारीत तळ गाठल्याने नागरिक हवालदिल झाले आहेत.

शासनाने चिंचोली व कोल्हार खुर्द या दोन गावांसाठी तब्बल दहा कोटींची संयुक्त जलजीवन योजना मंजूर केली नि प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात आली. मात्र प्रथम पाण्याच्या उद्भवाच्या ठिकाणी काम होणे अपेक्षित असताना अगोदर जलवाहिन्यांचे काम घाईघाईत सुरु करण्यात आले. तेही सध्या अपुर्णावस्थेत आहे. तर तीन एकर क्षेत्रावर असलेल्या साठवण तलावाचे काम अर्धवट अवस्थेत सोडण्यात आले आहे. सात ते आठ फुट खोदाई झालेल्या अर्धवट साठवण तलावात कालव्यातून सोडलेले पाणी मुरुमातून पाझरून जात चार, पाच दिवसात कोरडाठाक होत आहे. नवीन खोदाईच्या अगोदर साठवलेले पाणी किमान पंधरा दिवस साठवून राहात असल्याचे ग्रामस्थ सांगतात. आता तेच पाणी चार,पाच दिवसातच आटत आहे. जानेवारी महिन्यात ही अवस्था तर अजून पुढच्या पाच महिन्यात काय? हा प्रश्न सध्याच चिंचोलीकरांना सतावतोय.

एकूणच जलजीवन योजना ही गाव पाणीदार करणारी नि ठरणारी योजना सुरु झाल्यानंतरचा गवगवा मात्र त्या योजनेच्या अर्धवट नि सदोष कामामुळेच गावकऱ्यांना सध्या मृगजळ ठरल्याचे जळजळीत वास्तव आहे. या योजनेतून ग्रामस्थांची तहान भागविण्या ऐवजी कुणाकुणाची तहान भागली? हा खरा प्रश्न गुलदस्त्यात आहे. म्हणूनच जानेवारीत चिंचोलीकरांवर पाणीबाणीचे मोठे निसर्ग निर्मित नाही, तर मानवनिर्मित संकट ओढवले असून, यातून ग्रामपंचायत पदाधिकारी नि प्रशासन कसा मार्ग काढतात. हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे

### पत्रकारांनी वस्तूस्थिती मांडावी : कदम

**राहुरी : हॅलो प्रभात**

सत्ताधारी यांना आमच्या बाजूने चांगले लिहावे,तर विरोधकांना वाटते वांगल लिहावे.पण पत्रकारांनी वस्तुस्थिती मांडावी असे असे मत नगराध्यक्ष सत्यजित कदम यांनी मांडले. देवळाली प्रवरा नगर पालिकेच्या वतीने पत्रकार दिन साजरा करण्यात आला.बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून कार्यक्रमास सुरवात करण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुधाकर कराळे होते. यावेळी उपनगराध्यक्ष बेबीताई बर्डे कार्यालयीन अधिक्षक रामदास म्हस्के,अजित चव्हाण, मनिषा कदम, सीमा देठे, सौरभ मुसमाडे, सुवर्णा कोठूळे,सतिष वाळूंज, पुष्पा तांबे, अमोल कदम, प्रकाश संसारे, सुजाता कदम, राजेंद्र लोखंडे, चंदाराणी गाडे, वसंत कदम, शरद खांदे, आशाताई चव्हाण, तुकाराम पठारे, शरद वाळूंज, संतोष चोळके आदी उपस्थित होते. यावेळी पत्रकार रफीक शेख व शिवाजी घाडगे यांनी पत्रकारांच्या वतीने मनोगत व्यक्त केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. यावेळी पाणी पुरवठा अभियंता निखिल नवले,स्वप्निल फड,भुषण नवाल राजेंद्र चव्हाण,राजेंद्र पोकळे,तुषार सुपेकर,संभाजी वाळके,अभिषेक सुतावणे, गोरख भांगरे,कृष्णा महांकाळ, विजय साठे, सुदाम कडू, आदींसह अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन नगरसेवक प्रकाश संसारे यांनी तर आभार प्रदर्शन रामदास म्हस्के यांनी केले.

### आंदोलनाची रूपरेखा ठरविण्यासाठी प्रहार जनशक्ती पक्षाची बैठक

**राहुरी : हॅलो प्रभात**

येथील सार्वजनिक शौचालयांची तातडीने दुरुस्ती न झाल्यास २६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता अनोखे आंदोलन करण्याचा इशारा प्रहार जनशक्ती पक्षाने दिला आहे. यासंदर्भात आज १५ जानेवारी रोजी जिल्हा उपाध्यक्ष आप्पासाहेब ढूस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेऊन आंदोलनाची रूपरेषा ठरविण्यात आली. नगरपरिषदेकडे १ जानेवारी रोजी निवेदन देऊनही पंधरा दिवसांत दुरुस्ती न झाल्याने नाराजी व्यक्त करण्यात आली. तुटलेले दरवाजे, बंद लाईट, खराब पाणीपुरवठा, फुटलेली भांडी व तुंबलेले सेप्टिक टँक तातडीने दुरुस्त न केल्यास शौचालयात साठलेला मैला मिरवणुकीने नगरपरिषद कार्यालयात टाकण्याचा निर्णय घेण्यात आला. या बैठकीस चंद्रकांत कराळे, प्रकाश वाकळे, रजनीताई कांबळे, अफसाना शेख, वंदना कांबळे, गणेश भालके, प्रभाकर कांबळे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

### औताडे यांनी व्यवसायाचे कधीच राजकारण केले नाही : जावळे

**कोपरगाव : हॅलो प्रभात**

सावळिविहीर पोहेगाव सोनेवाडी या रस्त्याचे काम दोन वर्षांपूर्वी महायुती सरकारने मंजूर केले होते. सदरचे काम नितीन औताडे यांना मिळाले आहे. परंतु मागील दोन वर्षांपासून शासकीय कामांना अपुरा निधी मिळाल्याने तसेच यावर्षी मे ते नोव्हेंबर सहा महिने सततचा पाऊस सुरू असल्याने अनेक शासकीय कामे रखडलेली आहे. यामध्ये सदर रस्त्याचे काम देखील निधी अभावी करता आलेले नाही. महाराष्ट्रातील सर्वच ठेकेदारांची निधी अभावी कामे बंद होती. निधी मिळण्यासाठी आंदोलन देखील झाले होते. डिसेंबर २०२५ पासून शासनाकडून बऱ्यापैकी ठेकेदारांना मागील बिले मिळालेले असल्याने आता सर्वांनीच मागील रखडलेले कामे सुरू केले असून सदरचे काम देखील लवकरच सुरू होणार आहे.

## शिक्षक भारती कोपरगाव तालुका अध्यक्षपदी दिगंबर देसाई

**कोपरगाव : हॅलो प्रभात**

कोपरगाव तालुक्यातील शिक्षकांच्या हक्कासाठी व सन्मानासाठी कार्यरत असलेल्या 'शिक्षक भारती' या शासनमान्य संघटनेच्या तालुका अध्यक्षपदी (माध्यमिक विभाग) प्रा. दिगंबर देसाई यांची सन २०२६ ते २०२८ या कालावधीसाठी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. पुणे विभाग कार्याध्यक्ष प्रा. महेश पाडेकर यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीचे अधिकृत पत्र प्रदान करण्यात आले. या निवडीमुळे तालुक्यातील शिक्षक वर्तुळात समाधान व उत्साहाचे वातावरण असून अभ्यासू, लढाऊ व संघटनकौशल्य असलेले नेतृत्व मिळाल्याची भावना व्यक्त केली जात आहे. प्रा. देसाई यांनी शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा करण्याचा व संघटना अधिक बळकट करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. त्यांच्या निवडीबद्दल शिक्षक भारतीचे संस्थापक आमदार कपिल पाटील, प्रदेशाध्यक्ष अशोक बेलसरे, राज्य व जिल्हा पदाधिकारी, तसेच कोपरगाव तालुक्यातील विविध शैक्षणिक संस्थांचे पदाधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

## शिवसेनेचा बालेकिल्ला काबीज करण्यास काँग्रेसला यश

### अखेर पालिकेची लढाई काँग्रेस पक्षाने जिंकली : येरवड्यात पुन्हा काँग्रेसच

**पुणे : हॅलो प्रभात**

पूर्व हवेली तालुक्यातील शिवसेनेचा बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या येरवडा_गांधीनगर प्रभागातील हा गड काबीज करण्यास काँग्रेस पक्षाला यश येऊन पक्षाचे चारही उमेदवार निवडून आणण्यास सर्वच उमेदवारांनी महत्वाची भूमिका बजावली आहे.त्यामुळेच हे यश मिळाल्याचे बोलले जात होते.

यापूर्वी शिवसेना(उबाठा) या गटाचा प्रामुख्याने येरवडा-गांधीनगर प्रभाग प्रामुख्याने या पक्षाचा गड म्हणून ओळखला जात होता.पण ऐन निवडणुकीच्या तोंडावर गड शाबूत ठेवलेले भाजपचे पराभूत उमेदवार संजय भोसले यांनी भाजपात प्रवेश केल्याने निवडणुकीचे गणित सगळे फिरले जाऊन हा गड पुन्हा काबीज करण्यासाठी काँग्रेस पक्षश्रेष्ठींनी व उमेदवारांनी कंबर कसली होती.यावेळी काँग्रेसकडून अविनाश साळवे,सायरा शेख,अश्विनी लांडगे व विशाल मलके हे तर भाजपकडून संतोष आरडे, संजय भोसले,संगीता सुकाळे,आशा विटकर,तर शिवसेना शिंदे गटातून किशोर वाघमारे,कोमल वाघचौरे,स्नेहल जाधव,आनंद गोयल हे तर राष्ट्रवादी काँग्रेसकडून संध्या देवकर,ज्योती चंदेवल, अन्वर पठाण हे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असताना देखील काँग्रेस पक्षाच्या चारही उमेदवारांनी विरोधी पक्षातील उमेदवारांना पराभवाची धूळ चारत गेल्या अनेक वर्षांपासून प्रतीक्षा करत असलेल्या उमेदवारांनी विजय साकार करून प्रभागात बऱ्याच वर्षाच्या कालावधीनंतर पक्षाचा झेंडा फडकविण्यास यश मिळविल्याने पक्षश्रेष्ठींकडून व कारूकर्त्याकडून जल्लोष करून विजयी उमेदवारांचे अभिनंदन करण्यात आले असून पूर्वीपासूनच काँग्रेसला मानणारा मतदार वर्ग असल्यामुळे हा विजय साकारण्यात उमेदवारांना यश आले आहे.

## मक्रार संक्रांतीनिमित्त बाजार कट्टा उत्साहात संपन्न

**पेठ वडगांव : हॅलो प्रभात**

मिणचे (ता.हातकणंगले) येथील सलीम जमादार फौंडेशन यांच्या वतीने राजमाता जिजाऊ जयंती, स्वामी विवेकानंद जयंती व मक्रार संक्रांत निमित्त गावातील शालेय विद्यार्थी विद्यार्थीनीचा बाजार कट्टा भरविण्यात आला होता याचे उदघाटन आदर्श सहकार समूह मिणचे चे अध्यक्ष डॉ.श्री.डी एस घुगरे सर यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी बोलताना ते म्हणाले की

शालेय विद्यार्थ्यांना व्यवहार ज्ञान प्राप्त व्हावे त्यांना बाजार मधील घडामोडी कळाव्या या हेतुने त्याचबरोबर आज जाहिरातीचे युग चालू आहे या युगामध्ये टिकायचे असेल तर व्यवहार ज्ञान फार महत्वाचे आहे या बाजार कट्या मुळे गावातील शालेय विद्यार्थी विद्यार्थीनीना मकर संक्रांतीनिमित्त आपल्या शेतातील माल विकण्यासाठी बाजार उपलब्ध झाला सलीम जमादार आणि त्याच्या सहकार्याचे विशेष कौतुक केले पाहिजे यावेळी माजी सरपंच सर्जेराव वाकसे, युवा उद्योजक निलेश साळोखे,पत्रकार प्रकाश कांबळे,पोपटराव वाकसे, आदींनी कार्यक्रम प्रसंगी शुभेच्छा दिल्या या बाजार मध्ये मिणचे गावातील जवळपास 250 हून अधिक शालेय मुलांमुलींनी सहभाग घेतला होता सहभागी मुलांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले बाजारामध्ये एक लाख हून अधिक रुपयांची उलाढाल झाली

यावेळी ग्रा प सदस्य सलीम जमादार. मोनहर परीट सर, माजी सरपंच संजय देसाई, आझाद मोमीन (तलाठी मॅडम)रमेश नलवडे,जिनपाल देसाई,नितीन वाडकर,अभिजीत हंकारे,पोपट वाकसे सर, रणजित चौगले सर,,झाकीर जमादार, वसंत हंकारे, अमोल घाटके,नदीम मोमीन,डॉ रुपेश पाटील, दादासो माळी, सर्जेराव वाकसे,यांच्या सह ग्रामस्त उपस्थित होते सूत्रसंचालन नितिन कदम यांनी केले तर आभार परीट यांनी मानले

## श्रमसंस्कार शिबिरातून स्वयंसेवक व गावाचा सर्वांगीण विकास

**शेवगाव : हॅलो प्रभात**

अजय नजन

महाराष्ट्रातीलच नव्हे तर संपूर्ण भारतातील युवक सोशल मीडियामुळे दिवसेंदिवस भरकटत चालला असून एकत्र कुटुंब पद्धती लोप पावत आहे. अशा परिस्थितीत श्रमसंस्कार शिबिराच्या माध्यमातून समाजातील अडीअडचणी युवकांच्या लक्षात येतात. या शिबिरातून स्वयंसेवकांचा तसेच गावाचा सर्वांगीण विकास घडून येईल, असे प्रतिपादन माजी जिल्हा परिषद सदस्या व जिल्हा नियोजन मंडळ सदस्य (अहिल्यानगर) सौ. हर्षदाताई काकडे यांनी केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे संचलित कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे निर्मलाताई काकडे आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, शेवगाव आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने मौजे भगूर येथे दि. १६ ते २२ जानेवारी दरम्यान "शाश्वत विकासासाठी युवक : पाणलोट व पडीक जमीन व्यवस्थापन" या विषयावर विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

## सायकल यात्रेतून आरोग्य व पर्यावरणाचा संदेश

**कोपरगाव : हॅलो प्रभात**

जयभवानी सामाजिक व सांस्कृतिक संस्था, पिंपळगाव जलाल यांच्या वतीने तुळजापूर-अक्कलकोट सायकल यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या सायकल यात्रेच्या प्रवासादरम्यान यात्रेकरूंनी नुकतीच आत्मा मालिक ध्यानपीठ, कोकमठाण येथे सदिच्छा भेट दिली. या वेळी ध्यानपीठाच्या वतीने संत व विश्वस्त तसेच संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. नंदकुमारजी सूर्यवंशी साहेब यांनी सायकल यात्रेतील सहभागी सदस्यांचे स्वागत केले. याप्रसंगी संत व विश्वस्तांनी स्वतः सायकल रायडींगमध्ये सहभागी होत समाजाला आरोग्य व पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. यावेळी बोलताना मा. श्री. नंदकुमारजी सूर्यवंशी साहेब म्हणाले की, "आजचा युवक सोशल मीडिया व मोबाईलमध्ये अधिक अडकत चालला असून त्यामुळे आरोग्याकडे दुर्लक्ष होत आहे. प्रत्येकाने सायकलिंग व इतर व्यायाम प्रकारांचा अवलंब करून निरोगी जीवनशैली स्वीकारली पाहिजे." त्यांनी आपल्या बालपणीच्या सायकल चालवण्याच्या आठवणींना उजाळा देत जयभवानी संस्थेच्या सामाजिक उपक्रमांचे विशेष कौतुक केले. जयभवानी सामाजिक व सांस्कृतिक संस्था गेल्या अनेक वर्षांपासून दररोज २० किमी सायकल प्रवास, बालविवाह प्रतिबंध, पर्यावरण जागरूकता तसेच 'बेटी बचाओ – बेटी पढाओ' हे उपक्रम सातत्याने राबवत आहे. या कार्यक्रमास आत्मा मालिक ट्रस्टचे संत विश्वानंद महाराज, अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी, उपाध्यक्ष बाळासाहेब गोर्डे, सरचिटणीस हनुमंतराव भोंगळे,विश्वस्त प्रदीपकुमार भंडारी, जयभवानी संस्थेचे अध्यक्ष विजय भोरकडे, न्यायाधीश डॉ. विक्रम आव्हाड, डॉ. पूजा आव्हाड आदी मान्यवर उपस्थित होते

# सततच्या प्रयोगांनीच संशोधन होते

### डॉ.बी.व्ही.आर.मोहन रेड्डी : संजीवनी युनिर्व्हसिटी मध्ये आंतरराष्ट्रीय परीषद संपन्न

**कोपरगांव : हॅलो प्रभात**

तरूणांनी शिक्षण आणि उद्योग यांची सांगड घालत संशोधनाच्या दृष्टीने सततचे प्रयोग केले पाहीजे. शिक्षण , दीर्घ आयुष्य , आरोग्य सेवा, आपत्ती व्यवस्थापन, तंत्रज्ञान अशा अनेक विषयांवर संशोधन करणे गरजेचे आहे. सततच्या प्रयोगांनीच संशोधन होते. संशोधनाला बळकटी देण्यासाठी संजीवनी युनिर्व्हसिटीने उद्योगांशी समन्वय साधावा, असे प्रतिपादन हैद्राबाद स्थित सायंट या बहुराष्ट्रीय कंपनीचे संस्थापक अध्यक्ष व आयआयटी हैद्राबाद अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी.व्ही. आर. मोहन रेड्डी यांनी केले.

संजीवनी युनिर्व्हसिटी आयोजीत 'सस्टेनेबल इनोव्हेशन इन इंजिनिअरींग, सायन्स अँड मॅनेजमेंट' या विषयावरील आंतरराष्ट्रीय परीषदेच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन डॉ. बी.व्ही.आर. मोहन रेड्डी बोलत होते. संजीवनी युनिर्व्हसिटीचे प्रेसिडेंट श्री अमित कोल्हे यांनी परीषदेचे अध्यक्षस्थान भुषविले. यावेळी सन्माननिय अतिथी म्हणुन संयुक्त संचालक-संशोधन संघटना, भारतीय विद्यापीठे, नवी दिल्लीचे डॉ. अमरेंद्र पाणी, टोकुशिमा युनिर्व्हसिटी जपानचे प्राद्यापक डॉ. पंकज कोईंकर, युनिर्व्हसिटी ऑफ ऑक्सफर्ड अँड कोर्स डायरेक्टर, इंग्लंडचे डॉ. अजित जावकर, युनिर्व्हसिटी ऑफ चेस्टर (युके)चे डीन डॉ. अलेक्स फेन्टॉन, सुजीवनी युनिर्व्हसिटीचे व्हाईस चांसलर डॉ. ए.जी.ठाकुर, डीन कविथा राणी, संशोधन संचालक डॉ. पी. विलिअम व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी सर्व मान्यवरांच्या हस्ते 'अमुर्त स्मरणिकेचे' प्रकाशन झाले. या परीषदेमध्ये एकुण २५० रिसर्च पेपर्स सादर करण्यात आले होते. विविध ठिकाणचे प्राद्यापक व विद्यार्थ्यांची उपस्थिती उल्लेखनिय होती. प्रारंभी डॉ. पी विलिअम यांनी उपस्थितांचे स्वागत करून वक्त्यांची ओळख करून दिली. डॉ. कविथा राणी यांनी परीषदेच्या विषयावर उहापोह केला. डॉ. ठाकुर यांनी संजीवनी शैक्षणिक संकुलाचा प्रवास सांगताना संस्थापक स्व. शंकरराव कोल्हे यांची दुरदृष्टिता व त्या संदर्भात अध्यक्ष श्री नितिनदादा कोल्हे व प्रेसिडेंट श्री अमित कोल्हे करत असलेले प्रयत्न विशद केले.

डॉ. रेड्डी पुढे म्हणाले की हवामान आपत्ती हा एक महत्वाचा संशोधनाचा विषय आहे.तंत्रज्ञान हेच शाश्वत विकासासाठी पुरक ठरू शकते. राष्ट्र उभारणीत सहभागी होवुन उद्योजक बणुन नोकऱ्या देणारे बना, असा सल्ला त्यांनी दिला. डॉ. अमरेंद्र पाणी म्हणाले की संशोधनात उत्तमीकरण (जास्तीत जास्त प्रभावीपणा) असणे गरजेचे आहे. संशोधनातुन शाश्वत विकास साधल्यामुळे गरीबी, आणि भुक दुर होईल. जीवन सुलभ करण्यासाठी ज्ञानाचा वापर करा. एआय तंत्रज्ञानापर्यंत आपण पोहचलो आहोत, संशोधन समाजाला कसे उपयुक्त ठरेल याचा विचार सर्वांनी केला पाहीजे.